**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **उपराष्ट्रपती उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर; मुंबईत एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये करणार संविधान मंदिराचे तर नागपूरमध्ये रामदेवबाबा विद्यापीठात करणार डिजिटल टॉवरचे उद्घाटन.**
2. **20 सप्टेंबरला वर्ध्यातून अमरावती इथल्या मेगा टेक्स्टाईल पार्कचे पंतप्रधानांच्या हस्ते होणार भूमिपूजन- उद्योग मंत्री उदय सामंत यांची माहिती.**
3. **विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, व्ही.एन.आय.टी नागपूरचा 22 वा दीक्षांत समारंभ उदया; नीती आयोगाचे सदस्य डॉ.विजय कुमार सारस्वत यांची प्रमुख उपस्थिती.**
4. **पंतप्रधान नरेंद मोदी यांनी आयात शुल्कासंदर्भात घेतलेला निर्णयामुळे राज्यातील धान उत्पादन, सोयाबीन, कापूस आणि इतर तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

****

**जगदीप धनखड**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते दूरस्थ मध्यमातून मुंबईतील एल्फिन्स्टन टेक्निकल कॉलेजमध्ये राज्यभरातल्या ४३४ आय.टी.आय. संस्थांमधील संविधान मंदिरांचं उद्घाटन करतील. नागपूरच्या काटोल मार्गावरील रामदेव टेकडी इथल्या रामदेवबाबा विद्यापीठाच्या डिजिटल टॉवरचं उद्घाटन उद्या दुपारी तीन वाजता उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि त्यांच्या पत्नी डॉ.सुदेश धनखड यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन्, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी राज्यपाल, श्रीरामदेवबाबा सार्वजनिक समितीचे संस्थापक अध्यक्ष बनवारीलाल पुरोहित उपस्थित राहतील. रामदेवबाबा विद्यापीठाचे बारा मजल्याचे हे डिजिटल टॉवर अत्याधुनिक प्रणालींनी सुसज्ज असून, यात डिजिटल क्लास रूम आणि अत्याधुनिक प्रयोगशाळा आहेत. डिजिटल टॉवरच्या उद्घाटनप्रसंगी मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याचे आवाहन, श्रीरामदेवबाबा सार्वजनिक समितीचे सत्यनारायण नुवाल, आर.बी.यू.चे कुलपती, डॉ.एस.एस.मंथा, आर.बी.यू.चे कुलगुरू डॉ.आर.एस.पांडे, सरचिटणीस राजेंद्र पुरोहित यांनी केलं आहे.

**पीएम विश्वकर्मा**

केंद्र शासनाच्या 'पीएम विश्वकर्मा' योजनेतून कुशल कारागिरांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळाला असून, या योजनेचा वर्षपूर्ती सोहळा, वर्ध्याच्या बॅचलर रोडवरील स्वावलंबी मैदानावर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. वीस सप्टेंबरला होणाऱ्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील एकमेव अमरावती इथल्या पीएम मेगा टेक्सटाईल पार्कची पाया भरणीही आभासी पद्धतीनं होणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज वर्धा इथ पत्रपरिषदेत दिली. सामंत यांनी नियोजित कार्यक्रमाची जिल्हा प्रशासनाकडून सुरु असलेल्या तयारीचा आढावा घेत सभास्थळाची पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पीएम विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असून, लाभार्थ्यांना किट वाटप केलं जाणार असून, लाभार्थ्यांशी संवादही साधणार आहेत. हा कार्यक्रम देशभरात ७०० ठिकाणी पाहण्याची व्यवस्था जिल्हास्तरांवर करण्यात आली आहे. तसंच अमरावती इथल्या एक हजार वीस एकरात होणाऱ्या मेगा टेक्सटाईल पार्कची पाया भरणीही होणार असून, या कार्यक्रमाला ७० ते ७५ हजारांची उपस्थिती राहण्याचा अंदाज आहे. यासोबतच सूक्ष्म आणि लघू उद्योग मंत्रालयाच्यावतीनं प्रदर्शनीचंही आयोजन करण्यात आलं आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्वांनी सहकार्य करण्याचं आवाहनही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केलं आहे.

**हिंदी दिवस**

देशभरात आज राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा केला जात असून, चौदा सप्टेंबर १९४९ रोजी, संसदेनं हिंदीला राष्ट्रीय भाषेचा दर्जा दिला होता. तेव्हापासून आजचा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्तानं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशवासीयांना एका व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, देशाला एकसंध ठेवण्यात हिंदी भाषेची महत्त्वाची भूमिका असून, या भाषेचं रक्षण आणि संवर्धन करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असं प्रतिपादन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं राजभाषा हीरक जयंती उत्सवानिमित्त आयोजित चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर हिंदीत अभिमानानं भाषण करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ देशातच नव्हे तर, संपूर्ण जगासमोर हिंदीचं महत्त्व अधोरेखित केल्याचं ते म्हणाले. दरम्यान, या कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते या

दिना निमित्त टपाल विभागानं काढलेल्या विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं लोकार्पण झालं.

**बौद्ध परिषद**

बौद्ध धम्माच्या अनुयायांची मोठी संख्या असलेले महाराष्ट्र हे राज्य भगवान बुद्धांच्या शिकवणीचा देशभरात प्रसार करण्यामध्ये मध्यवर्ती भूमिका बजावेल, असे केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले आहे. “बुद्धाचा मध्यम मार्ग-जागतिक नेतृत्वाचा मार्गदर्शक” या विषयावर मुंबईत नेहरू विज्ञान केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसाच्या परिषदेत ते आज बोलत होते. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी पंतप्रधानांनी अलीकडेच आयोजित केलेल्या उपक्रमांकडे केंद्रीय मंत्र्यांनी लक्ष वेधले. यामध्ये भारत सरकारच्या वतीने बुद्ध पौर्णिमा व्यापक स्तरावर साजरी करण्यात आली. पंतप्रधान संयुक्त राष्ट्रे आणि युरोपीय संघांमध्ये सातत्याने भगवान बुद्धांच्या शिकवणींना अधोरेखित करत असतात, विशेषतः करुणा आणि सेवा यांची जागतिक प्रासंगिकता त्यातून प्रतिबिंबित होते, असे रिजिजू यांनी सांगितले.रिजिजू यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना देखील अभिवादन केले, ज्यांचा भारतीय राज्यघटनेचा अतिशय काळजीपूर्वक तयार केलेला मसुदा देशाची चौकट आणि देशातील जनता यांच्याविषयीच्या बांधिलकीचा दाखला आहे. यावेळी केंद्रीय मंत्र्यांनी बौद्ध समुदायाला पाठबळ देण्याच्या उद्देशाने तयार केलेल्या सरकारच्या अनेक कल्याणकारी योजनांची देखील सविस्तर माहिती दिली.

**राष्ट्रीय बुद्धिस्ट परिषद**

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक आणि इंडियन सोसायटी फॉर बुद्धिस्ट स्टडीज् जम्मू यांच्या संयुक्त विद्यमानं, राष्ट्रीय बुद्धिस्ट परिषदेचं आयोजन रामटेक इथ करण्यात आलं आहे. या परिषदेचं उद्घाटन आज डॉ.कमलाकर तोतडे सभागृह रामटेक इथ संपन्न झालं. या उद्घाटन समारोहाचे अध्यक्षस्थानी, कुलगुरू प्रो.हरेराम त्रिपाठी हे होते.प्रमुख अतिथी या नात्यानं २४व्या वार्षिक बुद्धिस्ट परिषदेचे अध्यक्ष म्हणुन प्रो.मुरली मनोहर पाठक, कुलगुरू लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली हे उपस्थित होते. आपल्या बीज भाषणात ते म्हणाले, बौद्ध तत्त्वज्ञान हे मानव केंद्रित असून, आचाराला यात सर्वाधिक महत्त्व आहे. बुद्धाने जीवन पद्धती सांगितली. बुद्ध दर्शन हे आचार आणि शास्त्र या दोन्ही रूपात सुरक्षित आणि संरक्षित आहे. त्याचे अधिकाधिक अध्ययन करणे आवश्यक असून, त्यासाठी पाली आणि प्राकृत भाषा शिकल्या पाहिजेत असे पाठक यांनी नमूद केल. यावेळी या परिषदेत सादर होणाऱ्या निबंधाचा सारसंग्रह तसंच

ओशन ऑफ बुद्धिस्ट विज्डम या पुस्तकासह, डॉ.भागचंद्र जैन यांच्या सहा आणि एस.पी.शर्मा यांच्या एका पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं.

**व्ही.एन.आय.टी**

नागपूरच्या विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात व्ही.एन.आय.टीचा २२वा दीक्षांत सोहळा उद्या सकाळी नऊ वाजता, संस्थेच्या सभागृहात आयोजित करणार आहे. महान दूरदर्शी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्त, व्ही.एन.आय.टी. दरवर्षी अभियंता दिनी, म्हणजेच १५ सप्टेंबर रोजी दीक्षांत समारंभ आयोजित करीत असते. या दीक्षांत समारंभाप्रसंगी नीती आयोगाचे सदस्य आणि रक्षा संशोधन आणि विकास संस्था अर्थात डी.आर.डी.ओ.चे माजी सचिव डॉ.विजय कुमार सारस्वत, व्ही.एन.आय.टी.च्या प्रशासक मंडळाचे अध्यक्ष, मदन गोपाल हे प्रमुख अतिथी म्हणून, उपस्थित राहतील अशी माहिती, व्ही.एन.आय.टी. नागपूरचे संचालक, प्रा.प्रेमलाल पटेल यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी शैक्षणिक विद्याशाखेचे अध्यक्ष, प्रा.विलास कळमकर, व्ही.एन.आय.टी.च्या यांत्रिकी विभागाचे प्राध्यापक आणि जनसंपर्क अधिकारी, मंगेश कोटंबकर उपस्थित होते. व्ही.एन.आय.टी.च्या दीक्षांत समारंभात एकूण 1,225 पदव्या प्रदान करण्यात येणार असून, ज्यात 95 डॉक्टर ऑफ फिलोसोफी, 239 विद्यार्थ्यांना एम.टेक., 60 विद्यार्थ्यांना एम.एस.सी.,765 अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ टेक्नोलॉजी तसंच, 73 विद्यार्थ्यांना, बॅचलर ऑफ आर्किटेक्चरची पदवी प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी व्ही.एन.आय.टी.च्या शैक्षणिक कामगिरी बद्दल, संस्थेचे संचालक प्रा.पटेल यांनी, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाद्वारे यावर्षी प्रसिद्ध करण्यात आलेल्या, नॅशनल इन्स्टिट्यूशन फ्रेमवर्क रँकिंग अर्थात एन.आय.आर.एफ. रँकिंगमध्ये, व्ही.एन.आय.टी.नं संपूर्ण देशात, अभियांत्रिकी श्रेणीत, ३९वं स्थान आणि राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थामध्ये, सहावे स्थान तर आर्किटेक्चर प्लॅनिंग श्रेणीत, दहावे स्थान पटकावले असून, एकंदरीत क्रमवारीमध्ये, ७७वं स्थान प्राप्त केलं असल्याची माहिती दिली. व्हि.एन.आय.टी. कॅम्पसमध्ये, 185 संस्थांच्या सहकार्यानं, 813 विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या असून, यात सर्वात जास्त पॅकेज हे ६४ लाख प्रति वर्ष असे होते अशी माहिती देखील, संचालकांनी यावेळी दिली.

**फडणवीस**

केंद्र सरकारनं कच्च्या तेलावर वीस टक्के आणि सुर्यफुलाच्या तेलावर बत्तीस टक्के आयात शुल्क लागू केलं आहे. वित्त मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, कच्चे पाम तेल, सोयाबीन आणि सुर्यफुलावरील आयात शुल्क वीस टक्क्यांनी वाढवलं असून, या तेलांवर या पुढे पस्तीस टक्के आयात शुल्क द्यावं लागणार आहे. या

बरोबरच अन्नधान्य महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्यावर्षी लागू केलेले, बासमती तांदूळ आणि कांद्यावरील किमान निर्यात मूल्य रद्द करण्याचा निर्णयही घेतला आहे. शेतकऱ्यांचा भल्याचा विचार करुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कच्च्या खाद्य तेलावरील आयात शुल्क वाढविण्यासह, बासमती तांदळाच्या निर्यातीसाठी सुद्धा किमान निर्यात किंमत ही पूर्णपणे मागे घेण्यात आली आहे. कांद्यावरील किमान निर्यात मुल्य रद्द करण्याचा निर्णय हा अत्यंत लाख मोलाचा आहे. या निर्णयामुळ धान उत्पादन, सोयाबीन, कापूस आणि इतर तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. शेतकऱ्यांच्या अत्यंत हिताचा हा निर्णय घेतल्याबद्दल, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, नागपुरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलतांना आभार मानले.

**श्रवणयंत्र वितरण**

ज्यांना पाय नाहीत त्यांना कृत्रिम पाय लावून देणे, गरजूंना श्रवणयंत्र देणे, ट्रायसिकल देऊन, दिव्यांगांच्या उदर निर्वाहाचा प्रश्न सोडविणे ही कामे करताना माझ्या मनाला कमालीचं समाधान प्राप्त होते. माझ्या दृष्टीनं, दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे असं प्रतिपादन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरात केलं.आधार संस्था आणि वेकोलिच्या संयुक्त विद्यमानं गरजू विद्यार्थ्यांना सॉफ्टमोड सहित श्रवणयंत्र वितरित करण्यात आलं. धनवटे कॉलेजच्या, मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला, मंत्री गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी वेकोलिचे अध्यक्ष तसंच व्यवस्थापकीय संचालक, जयप्रकाश द्विवेदी, समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वसन आणि दिव्यांग सशक्तिकरण केंद्राचे संचालक प्रफुल्ल शिंदे, आधार संस्थेचे अध्यक्ष, सुमित ताटे उपस्थिती होते. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात, नायरा चचाने, स्वयम महाजन, युग चोरकर, अंजली सहारे, मीनाक्षी बघेल या विद्यार्थ्यांना, गडकरी यांच्या हस्ते, श्रवणयंत्र देण्यात आलं.

******